N.C.R.B (एन.सी.आर.बी.)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर  **P.S.(ठाणे):** निजामपूरा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0098  **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/03/2023 01:35

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिनांक पासून):** 17/03/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 17/03/2023
**Time From (वेळेपासून):** 16:16 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:36 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 17/03/2023  **Time (वेळ):** 17:55 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 002

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/03/2023 01:18 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** भिवंडी निजामपूर शहर,महानगरपालिका, भिवंडी, जि ठाणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** तुळशी बाबू आहीर
(b) **Father's Name (वडील चे नाव) :** बाबू आहीर
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1992
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | महानगरपालिका वसाहत बिल्डींग नं,1, दुसरा मजला, नवजीवन कॉलनी, पद्मानगर, राम मंदिरा जवळ, ,भिवंडी,निजामपूरा,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | महानगरपालिका वसाहत बिल्डींग नं,1, दुसरा मजला, नवजीवन कॉलनी, पद्मानगर, राम मंदिरा जवळ, ,भिवंडी,निजामपूरा,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-8788104671

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | बाळा नारायण जाधव | | | 1. भिवंडी निजामपूर शहर , महानगरपालिका, भिवंडी,, निजामपूरा,ठाणे शहर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य रु.) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 15,000/ रु. लाचेची रक्कम | 15,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):**

15,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

गु.र.नं 98/2023 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 (संशोधन 2018 ) चे कलम 7 प्रमाणे

मी, श्री. तुळशी बाबू आहीर, वय-31 वर्षे, राह. महानगरपालिका वसाहत बिल्डींग नं.1, दुसरा मजला, नवजीवन कॉलनी, पद्मानगर, राम मंदिरा जवळ, भिवंडी, जि.ठाणे. मोबाईल क्र. 8788104671, फिर्याद लिहुन देतो की,

मी दि. 16/03/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे कार्यालय येथे जावून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणेचे पोलीस निरीक्षक जगदीश गावीत यांची भेट घेतली. त्यांना मी लोकसेवक बाळाराम जाधव हे त्यांचे स्वतःकरीता माझ्याकडे लाचेची मागणी करत असलेबाबत सांगितले. त्यावेळी पोलीस निरीक्षक जगदीश गावीत यांनी मला माझी तक्रार स्वःहस्ताक्षरात लिहुन देण्यास सांगितली असता, माझे हस्ताक्षरात मी तक्रार लिहून दिली असून त्यावर सही केली. मी दिलेल्या तक्रारीचा आशय खालील प्रमाणे.

माझे वडिल श्री.बाबु भगवान आहीर, वय -53, व्यवसाय -नोकरी सफाई कामगार- भिवंडी निजामपुरा महानगरपालिका, भिवंडी येथुन दिनांक 28/02/2023 रोजी स्वेच्छा निवृत्ती घेतली आहे. माझ्या वडीलांच्या स्वेच्छा निवृत्ती नंतर सदर ठिकाणी वारसाहक्काने मला नोकरीत सामावून घेण्यासाठी माझ्या वडीलांनी दिनांक 06/03/2023 रोजी अर्ज दिला आहे. तसेच मी देखील माझे वडील श्री. बाबु भगवान आहीर यांच्या स्वेच्छा निवृत्ती नंतर सदर ठिकाणी वारसाहक्काने मला नोकरीत सामावून घेण्यासाठी दिनांक 06/03/2023 रोजी अर्ज दिला आहे.

सदर अर्जाच्या अनुषंगाने मी दिनांक 15/03/2023 रोजी भिवंडी निजामपुरा महानगरपालिका, भिवंडी कार्यालयांतर्गत असलेल्या आस्थापना शाखेमधील श्री. बाळाराम जाधव, लिपीक यांचेकडे चौकशी करण्याकरीता गेलो असता, त्यांनी मला वडीलांच्या जागेवर वारसाहक्काने कामावर घेण्यासाठी माझ्याकडे 30,000/-रु लाचेच्या रक्कमेची मागणी केलेली आहे. मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने व आमची कुठल्याही प्रकारे आर्थिक देवाण-घेवाण झालेली नसल्याने सदरहु लोकसेवक श्री. बाळाराम जाधव, लिपीक यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई करणेबाबत मी कायदेशीर तक्रार दिली.

मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी कारवाई करावयाची असल्याने पोनि गावीत यांनी अंबरनाथ नगरपरिशद, अंबरनाथ कार्यालयातील दोन शासकिय पंचांना बोलावुन घेवुन त्यांना तक्रारीची थोडक्यात हकीकत समजावून सांगुन पोनि.गावीत यांनी मी दिलेली तक्रार दोन्ही पंचांना वाचावयास दिली. दोन्ही पंचांनी सदरची तक्रार वाचून माझे तक्रारीवर सहया केल्या आहेत.

त्यानंतर पोनि गावीत यांनी माझेसह दोन्ही पंचांशी विचारविनमय करुन मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने पडताळणी कारवाई करण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी मी दोन्ही पंचासमक्ष पोनि. गावीत यांना कार्यालयीन वेळ संपल्याने लोकसेवक बाळाराम जाधव हे कार्यालयात मिळुन येण्याची शक्यता कमी आहे. तरी पडताळणी कारवाई दिनांक 17/03/2023 रोजी करण्यात यावी असे सांगितले. त्यावेळी पोनि. गावीत यांनी दोन्ही पंचांशी तसेच तक्रारदार यांचेशी विचारविनीयम करून मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात येणारी पडताळणी कारवाई दिनांक 17/03/2023 रोजी करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर दि. 17/03/2023 रोजी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दोन पंच साक्षीदारांसमक्ष सर्व कायदेषीर बाबींचा अवलंब करुन पडताळणी कारवाई करण्यात आली. पडताळणी कारवाई वेळी मला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावुन पंच साक्षीदार क्र. 1 श्री. शेळके यांचेसमवेत लोकसेवक कार्यरत असलेल्या भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी यांचे कार्यालयात पडताळणी कारवाई करीता पाठविण्यात आले. लोकसेवक बाळाराम

जाधव हे मला कार्यालयाच्या बाहेर असलेल्या पार्किंग मध्ये भेटले. त्यावेळी मी लोकसेवक जाधव यांना आपलं पंधरा तारखेला तुम्ही बोलले ना ..... तीस हजाराचं तेवढी अमाउंट झालेली नाही ये....आता सध्या पंधरा ते वीस हजार रुपये आहेत....त्यावेळी श्री. जाधव यांनी हा..असे म्हटले. त्यावेळी मी त्यांना काय करता बोला दुपारी किती आणून देवू तुम्हाला..मी काय म्हणतो मी तुम्हाला वीस देतो त्यावेळी जाधव यांनी हा म्हटले त्यानंतर मी काम झाल्यानंतर फाईल आल्यानंतर दहा देतो तुम्हाला. त्यावेळी जाधव यांनी चालेल रे तसे हरकत नाही आहे..असे म्हटले..त्यानंतर मी मग आता तुम्हाला किती देवू असे विचारले असता जाधव यांनी किती देतो...दे किती आणले असतील ते देवून ठेव मग साहेबांना देवून फाईल पुढे पुढे नेतो ना ....देवून ठेव ना असे म्हटले. त्यावेळी मी बँकेतून काढावे लागतील असे सांगितले त्यावेळी त्यांनी हा मग दुपारी ये असे म्हटले. त्यावर मी किती वाजता येवू असे विचारले असता त्यांनी चार पाच वाजता ये असे सांगून लाचेची मागणी केल्याने मी व पंच षासकीय वाहन उभे असलेल्या ठिकाणी पंचासह परत आलो. त्यानंतर पोनि. गावीत यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमधील संभाशण लक्षपूर्वक ऐकले असता 30,000 /-रुपये लाचेची मागणी करुन रु. 15,000/- ते रु. 20,000/- रुपये घेवून येण्यास सांगून ते स्विकारण्याचे मान्य करुन उर्वरीत रक्कम काम झाल्यानंतर स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले. त्यावेळी पोनि गावीत यांनी दोन्ही पंचासी व माझेसी विचारविनिमय करुन सापळापूर्व व सापळा कारवाई लागलीच करण्याचा निर्णय घेवून पडताळणी सापळापूर्व सापळा कारवाई एकत्रित करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर पोनि. गावीत यांनी मला लाचेची रक्कम हजर करण्यास सांगितले असता मी त्यांचेकडे माझे बचतीमधील रक्कम 15,000/- रु. लाचेची रक्कम म्हणून हजर केली. लाचेची रक्कम हजर केल्यानंतर सदर नोटांचे नंबर एका कागदावर लिहून घेण्यात आले. त्यानंतर पोनि.गावीत यांनी दोन पंचासमक्ष सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करुन सापळापुर्व कारवाईच्या नोंदी घेवुन लाचेची रक्कम म्हणुन हजर केलेल्या 15,000/-रू अँन्थ्रासिन पावडर लावुन सापळापुर्व कारवाई शासकीय वाहनात पूर्ण करुन भिवंडी निजामपुर शहर मनपा, भिवंडी येथे सापळा आयोजित करण्यात आला. .

सापळा कारवाईवेळी मला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावुन पंच साक्षीदार यांचे समवेत भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी यांचे कार्यालयात अँन्थ्रासीन पावडर लावलेली 15,000/-रू लाचेची रक्कम लोकसेवक बाळाराम जाधव यांना देण्यासाठी जावून भेटलो व त्यांचेसी मी माझे कामासंबंधी चर्चा केली. त्यावेळी मी लोकसेवक जाधव यांना सकाळी बोलले ना....पंधरा हजार रुपये झाले असे म्हटले त्यावेळी लोकसेवक जाधव यांनी हं असे म्हटले त्यानंतर मी मग आता काय करु बोला असे विचारले असता लोकसवेक जाधव यांनी देवून टाक अस म्हटले.. त्यानंतर मी पंधरा आधी घ्या नंतर माझी फाईल पूर्ण करा..तो पर्यत देतो ना पंधरा हजार काम झाल्यानंतर देतो ना मी तुम्हाला पण असे म्हटले. त्यावेळी लोकसेवक जाधव यांनी नंतर पण द्यायला लागतील ना कारण आपल्याला असे म्हटले त्यावेळी मी देतो ना मी आता पंधरा तरी ठेवा माझी फाईल तरी पुढं काढाना ...माझी फाईल तरी पुढं सरकवाना असे म्हटले त्यानंतर त्यांनी ते तर फाईल पुढं सरकवतोना मी दे आता असे म्हटले. त्यानंतर मी आता देवू असे विचारले त्यावेळी लोकसेवक जाधव यांनी दे...ना काय माहित आहे ना नंतर वरती शेवट परत कमी असं नको व्हायला...असे म्हटले त्यानंतर मी हे हे घ्या हे घ्या पटकन ..म कधी होईल आता असे बोलून मी लाचेची रक्कम उजव्या हाताने देवून लोकसेवक यांनी डाव्या हाताने स्विकारुन नेसूस पॅन्टच्या समोरील बाजूच्या डाव्या खिशामध्ये ठेवली. त्यावेळी मी लाचेच्या रक्कमेचा स्विकार झाल्याचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी पोनि.गावीत व सापळा पथकाने लोकसेवक बाळाराम नारायण जाधव यांना 16:35 वाजता वा. ताब्यात घेतले. त्यानंतर लोकसेवक बाळाराम नारायण जाधव यांचे नेसूस पॅन्टच्या समोरील बाजूच्या डाव्या खिशातून लाचेची रक्कम जप्त करण्यात आली असुन त्याबाबत पडताळणी सापळापूर्व सापळा कारवाई करण्यात आली आहे. संपुर्ण पडताळणी सापळापूर्व सापळा कारवाईत डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरचा वापर करून मेमरी कार्डमध्ये माझेत व लोकसेवक यांचेत झालेले संभाषण ध्वनिमुद्रीत करण्यात आले आहे.

मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पडताळणी सापळापूर्व सापळा कारवाईअंती लोकसेवक बाळाराम जाधव यांचे नाव बाळा जाधव असल्याचे निश्पन्न झाले आहे.

मला वडीलांच्या स्वेच्छा निवृत्ती नंतर वारसाहक्काने नोकरीत सामावून घेण्यासाठी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी, या कार्यालयात केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने लोकसेवक बाळा नारायण जाधव, वय 52, पद- लिपीक (वर्ग-3), नेमणूक- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी, जि. ठाणे. यांनी त्यांना मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरुपयोग करुन स्वतःचा आर्थिक फायदा करून घेण्यासाठी पडताळणी कारवाईवेळी माझेकडे 30,000/-रूपये लाचेच्या रक्कमेची मागणी करून 15,000/- रु. ते 20,000/- रुपये घेवून येण्यास सांगून ते स्विकारण्याचे मान्य केले. उर्वरीत रक्कम काम झाल्यानंतर स्विकारणार असल्याचे सांगितले. लोकसेवक बाळा जाधव यांनी सापळा कारवाईवेळी माझेकडून 15,000/- रु. लाचेची रक्कम स्विकारल्याने माझी लोकसेवक बाळा नारायण जाधव, वय 52, पद- लिपीक (वर्ग-3), नेमणूक - भिवंडी निजामपूर षहर

महानगरपालिका, भिवंडी, जि.ठाणे यांचेविरुध्द कायदेषिर फिर्याद आहे.
माझी वरील फिर्याद मी सांगितलेप्रमाणे मराठीत लॅपटॉपवर टंकलिखित करण्यात आली असून ती मी वाचुन पाहिली असता, ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

NARESH PANDURANG PAWAR(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant. (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

पोलीस ठाणे अंमलदार
निजामपूरा पोलीस ठाणे भिवंडी

**Name (नाव):** NARESH PANDURAN

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):**